क्रमांक:- १४८५ / ग-२
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
विधान भवन, मुंबई.
दिनांक:- २८ जानेवारी, २०२१.

## :: परिपत्रक ::

आपणांस कळविण्यात येते की, देशाच्या स्वातंत्र्यासाठी प्राणार्पण केलेल्या हुतात्म्यांच्या स्मरणार्थ आदर व्यक्त करण्यासाठी शनिवार, दिनांक ३० जानेवारी, २०२१ रोजी सकाळी ११.०० वाजता दोन मिनिटे मौन (स्तब्धता) पाळून हा दिवस हुतात्मा दिन म्हणून पाळण्यात येणार आहे. त्यानुसार या सचिवालयातील अधिकारी/कर्मचारी यांना मौन (स्तब्धता) पाळण्याची सुरुवात होण्यापूर्वी इशारा म्हणून सकाळी ठीक १०.५९ पासून ११.०० वाजेपर्यंत या सचिवालयाच्या PUBLIC ADDRESS SYSTEM द्वारे सूचित करण्यात येईल. तद्नंतर दोन मिनिटे मौन (स्तब्धता) पाळल्यानंतर सकाळी ११.०२ मिनिटांनी मौन (स्तब्धता) संपल्यासंबंधी PUBLIC ADDRESS SYSTEM द्वारे सूचित करण्यात येईल.

तसेच राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या पुण्यतिथी निमित्त विधान भवन, मुंबई येथे त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्याचा कार्यक्रम सकाळी ११.०५ वाजता आयोजित करण्यात आला आहे.

(रविंद्र जगदाळे)
अवर सचिव,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.

प्रति :-

१) मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे सचिव, मा.उपसभापती, महाराष्ट्र विधानपरिषद व मा.उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे खाजगी सचिव.
२) मा.विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानपरिषद, मा.विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानसभा यांचे खाजगी सचिव.
३) सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे वरिष्ठ स्वीय सहाय्यक.
४) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील उप सचिव.
५) जनसंपर्क अधिकारी, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.
६) मुख्य सुरक्षा अधिकारी, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधान भवन, मुंबई.
७) समादेशक अधिकारी, अग्निशमन विभाग, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधान भवन, मुंबई.
८) विधान भवनातील सार्वजनिक बांधकाम (स्थापत्य व विद्युत) विभाग.
९) व्यवस्थापक, उपहारगृह, विधान भवन, मुंबई.